www.esakal.com
सकाळ
मुंबई । मंगळवार, २२ जून २०१० । किंमत २ रुपये ५० पैसे । पाने २० (८ पानी टुडेसह)

# 'अवतार'चा कॅमेरा भारतात

**मुंबई** : हॉलीवूडमध्ये, एखादे अद्ययावत चित्रपट तंत्रज्ञान लोकप्रिय ठरले, की ते भारतात आणण्याचा विचार अनेक निर्माते-दिग्दर्शक करीत असतात. हॉलीवूडच्या पावलावर पाऊल टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आता 'अवतार' या बहुचर्चित जगप्रसिद्ध चित्रपटासाठी वापरण्यात आलेला थ्रीडी कॅमेरा भारतात आणण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात बॉलीवूडमध्येही 'अवतार'च्या आसपास जाणारे थ्रीडी चित्रपट बनविले जाण्याची आशा करण्यास हरकत नाही.

'टायटॅनिक'फेम जेम्स कॅमेरॉनच्या 'अवतार' या चित्रपटाने जगभर धुमाकूळ घातला होता. अनेक पुरस्कार या चित्रपटाने मिळविले होते. एवढेच नाही तर यशाचे अनेक विक्रम त्याने मोडीत काढले. या चित्रपटातील थ्रीडी तंत्रज्ञान सगळ्यांच्या औत्सुक्याचा आणि कुतूहलाचा विषय ठरला होता. त्यामुळे भारतातील प्रख्यात 'प्रसाद प्रॉडक्शन'ने हा कॅमेरा येथे आणला आहे. याबाबत 'प्रसाद ग्रुप'चे म्हणजे एल. व्ही. प्रसाद यांचा मुलगा रमेश प्रसाद माहिती देताना म्हणाला, 'हैदराबाद येथे आमचे आयमॅक्स मल्टिप्लेक्स आहे. तेथे 'अवतार' पाहण्यासाठी रसिकांनी गर्दी केली होती. चित्रपट बनविण्यासाठी वापरलेल्या अत्याधुनिक थ्रीडी तंत्रज्ञानाचे आकर्षण सर्वांनाच होते. त्याच वेळी अशा प्रकारचा कॅमेरा भारतात आणून चित्रपट काढायचा असे आम्ही ठरविले होते. 'छोटा चेतन' हा हिंदी चित्रपट थ्रीडी तंत्राद्वारे बनविण्यात आला होता. त्यावर भरपूर खर्च करण्यात आला होता; मात्र आता भारतातच अशा प्रकारचा कॅमेरा आणल्यामुळे थ्रीडी चित्रपट आणि जाहिरातीही कमी खर्चात बनविण्यासाठी याचा उपयोग होईल.'

'प्रसाद ग्रुप'ने यापूर्वी 'हमराही', 'खिलौना', 'एक दुजे के लिये', 'बिदाई' आदी चित्रपट बनविले आहेत. थ्रीडी तंत्रासाठी लागणारा कॅमेरा त्यांनी भारतात आणल्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीने तंत्रज्ञानात आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.



थ्रीडी कॅमेऱ्यासोबत अभिनेता जितेंद्र.